सत्यमेव जयते

मंत्रालयीन सेवा

# महाराष्ट्र शासन

## गृहनिर्माण विभाग

**सुधारित इतिवृत्त**

३ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (मुख्य इमारत), मुंबई-४०००३२

ई-मेल: gnp-housing@mah.gov.in दूरध्वनी क्र.०२२-२२७९३६९६

क्रमांक: संकीर्ण २०२५/प्र.क्र.०७/गृनिप दिनांक: ०६ फेब्रुवारी, २०२५

प्रति,

अपर मुख्य सचिव (वने),
महसल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

**विषय**:- संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रकल्पांतर्गत अतिक्रमणकर्त्यांच्या पुनर्वसनासाठी लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणासाठी सल्लागारांच्या नियुक्तीसाठी सादरीकरणाबाबत

ादय,

उपरोक्त विषयाबाबत संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रकल्पांतर्गत अतिक्रमणकर्त्यांच्या पुनर्वसनासाठी लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणासाठी सल्लागारांच्या नियुक्तीसाठी सादरीकरण करण्याबाबत मा. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखालील दि.३१.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीचे इतिवृत्त पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

PBPandit

(प्रमोद पंडित)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे

**प्रत** :- निवडनस्ती (गृनिप).

## मा. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.३१/०१/२०२५ रोजी दु.११.०० वाजता त्यांच्या मंत्रालयीन दालनात खालील विषयासंबंधातील बैठकीचे इतिवृत्त

विषय :- संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रकल्पातील अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसन अंतर्गत लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणासाठी सल्लागारांच्या नियुक्तीसाठी सादरीकरणाबाबत.

उपरोक्त विषयाबाबत मा. अ.मु.स.(गृहनिर्माण) यांच्याकडे आयोजित बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी व सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते :-

१. श्री. अजित कवडे, उप सचिव, गृहनिर्माण विभाग
२. श्री.विवेक होशिंग (भावसे), उप सचिव (वने), महसूल व वन विभाग
३. श्री. सुनिल उकिरडे, अवर सचिव, गृहनिर्माण विभाग
४. श्री. इमाम अली, संचालक, मे.ग्रांट थॉर्टन भारत एलएलपी
५. श्री. विवेक गौतम, सहयोगी संचालक, मे.ग्रांट थॉर्टन भारत एलएलपी
६. श्रीम. पायल सिंगवी, सल्लागार, मे.ग्रांट थॉर्टन भारत एलएलपी

➢ संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रकल्पांतर्गत अतिक्रमणकर्त्यांच्या पुनर्वसनासाठी PMAY-2.O याअंतर्गत लाभार्थ्यांच्या सर्वेक्षण/ सल्लागार संस्थेच्या नियुक्तीसाठी माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि.०५.१०.२३ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार विहित केलेल्या ६ संस्थांना दि.१४.०१.२०२५ रोजी सादरीकरण करण्याबाबत कळविण्यात आले. तथापि, ६ संस्थांपैकी फक्त मे.ग्रांट थॉर्टन भारत एलएलपी यांनी याबाबत इच्छुकता दर्शविली. त्यामुळे दि.२८.०१.२०२५ च्या पत्रान्वये पुन्हा ६ संस्थांना दि.३१.०१.२०२५ रोजी सादरीकरणाबाबत कळविण्यात आले. ६ संस्थांपैकी मे.ग्रांट थॉर्टन भारत एलएलपी यांनी दि.३१.०१.२०२५ रोजी अ.मु.स. (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांसमोर सदर विषयाचे सादरीकरण केले आहे.

➢ सदर संस्थेने केलेल्या सादरीकरणात, संस्थेने केलेल्या कामाविषयी थोडक्यात माहिती सादर केली. सदर प्रकल्पाचे सर्वेक्षण करण्याचे टप्पे याबाबत माहिती दिली. प्रत्येक पथकात १० शहरी स्तर तांत्रिक कक्ष (CLTC) सदस्य आणि १ राज्य स्तर तांत्रिक कक्ष (SLTC) पर्यवेक्षक याप्रमाणे एकूण ३ पथके तयार केले जातील. सदर सर्वेक्षणाचे काम दोन महिन्यात करण्याचे प्रस्तावित आहे.

➢ PMAY-2.O च्या मार्गदर्शक सुचनेनुसार शहरी स्तर तांत्रिक कक्ष (CLTC) सदस्यांसाठी प्रतिमहिना रु.७०,०००/- व राज्य स्तर तांत्रिक कक्ष (SLTC) पर्यवेक्षकासाठी प्रतिमहिना रु.१,००,०००/- असे दर निश्चित करण्यात आले आहेत. परंतु मे.ग्रांट थॉर्टन भारत एलएलपी यांनी दि.१७.०१.२०२५ च्या पत्रान्वये, कामाची व्यापकता व समयबध्दता पाहता, शहरी स्तर तांत्रिक कक्ष (CLTC) मधील सदस्यांसाठी प्रत्येकी प्रतिमहिना रु.७०,०००/- या ऐवजी रु. १,००,०००/- व राज्य स्तर तांत्रिक कक्ष (SLTC) पर्यवेक्षकासाठी प्रतिमहिना रु.१,००,०००/- या ऐवजी रु. १,३०,०००/- अशा सुधारित दराने काम मिळणेबाबत विनंती करण्यात आली आहे.

➢ उप सचिव (वने) यांनी सदर सर्वेक्षणाचे काम मुदतीत होणे आवश्यक असल्याने संस्था निवडीचा निर्णय तातडीने घेण्याबाबत तसेच अतिरिक्त खर्चाचा भार उचलण्यास वन विभागाची तयारी असल्याचे नमूद केले.

➢ चर्चेअंती मा. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत:-

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी कुटुंबे व अतिक्रमणधारक यांचा एकत्रित सर्व्हे करुन प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत पात्रता निश्चित करण्यासाठी सल्लागार/ सर्वेक्षण संस्थेची १० दिवसात नेमणूक करावी, असे मा.मुख्य सचिव यांचे निर्देश आहेत. तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी कुटुंबे व अतिक्रमणधारक यांचे पुनर्वसन करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करण्याचे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देश आहेत. या सर्व बाबी विचारात घेता, वन विभागाने केंद्रिय गृहनिर्माण व शहरी कामकाज मंत्रालय यांचे PMAY-2.O अंतर्गत सल्लागार/ सर्वेक्षण संस्था नियुक्तीबाबतचे निकष विचारात घेऊन, शहरी स्तर तांत्रिक कक्ष (CLTC) सदस्यांसाठी प्रतिमहिना रु.७०,०००/- व राज्य स्तर तांत्रिक कक्ष (SLTC) पर्यवेक्षकासाठी प्रतिमहिना रु.१,००,०००/- असा मानधनाचा दर निश्चित करुन मे.ग्रांट थॉर्टन भारत एलएलपी यांची सर्वेक्षण संस्था म्हणून नियुक्ती करावी.

तसेच उप सचिव (वने) यांनी मान्यता दिल्यानुसार कामाचे स्वरुप व तातडी विचारात घेता, राज्य स्तर तांत्रिक कक्ष (SLTC) पर्यवेक्षकासाठी प्रत्येकी रु. ३०,०००/- प्रतिमहिना व शहरी स्तर तांत्रिक कक्ष (CLTC) सदस्यांसाठी प्रत्येकी रु. ३०,०००/- प्रतिमहिना याप्रमाणे अतिरिक्त खर्च अदा करावा.

उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

*******************